# मुंबई विद्यापीठ

अत्यंत तातडीचे/हस्ते बटवडा/स्पीड पोस्ट
क्रमांक घ.म./पी.आय.वो - १/ ५९५८४/२०१३
मुंबई - ४०० ०३२
६० एप्रिल, २०१३

प्रति,
ॲड. बाळासाहेब सोनाजीराव गरजे
आदित्य सदन,
गिरी हॉस्पीटल समोर,
डी.पी. रोड, आदर्श नगर,
**बिड - ४३१ १२२.**

महोदय / महोदया,

आपण दिनांक २५ मार्च २०१३, रोजीच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विचारलेली माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे :-

१) श्री जगदिशप्रसाद झाबरामल तिबरेवाला विश्वविद्यालय, राजस्थान या खाजगी विद्यापीठातील पी.एच.डी. ही डिग्री मुंबई विद्यापीठ व संलग्नीत महाविद्यालयामध्ये सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी ग्राहय धरली जाते की? आणि सहाय्यक प्राध्यापक या पदाची भरती कशा प्रकारे होते आणि ~~त्याची~~ त्याकरीता शैक्षणिक अर्हता कशा प्रकारची आहे त्याचा तपशील द्यावा.

**उत्तर:-** विद्यापीठ अनुदान आयोगाने श्री जगदिशप्रसाद झाबरामल तिब्रेवाला विश्वविद्यालयास मान्यता दिली आणि त्यांचे नाव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या यादीत असल्यास व पी.एच.डी. या पदवीस विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता असल्यास सदरची पदवी मुंबई विद्यापीठाअंतर्गत असलेल्या महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता ग्राहय धरण्यात येते तसेच संलग्नित महाविद्यालयाने जाहिरात प्रसिध्द करून सहाय्यक प्राध्यापकची भरती केली जाते त्याची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:

अ) पदव्युत्तर परिक्षेत ५५% टक्के गुण.

ब) चांगला शैक्षणिक रेकॉर्ड.

क) नेट / सेट किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाचे तिस-या दुरूस्तीप्रमाणे पी.एच.डी. पदवी प्राप्त केलेली असल्यास त्यास नेट / सेट अहर्तेतून सूट दिलेली आहे.

आपण जर वरील उत्तराबाबत समाधानी नसाल तर आपणांस असेही कळविण्यात येते की, उपकुलसचिव हे घटक महाविद्यालय व संस्था कक्ष या विभागाचे अपिलीय प्राधिकारी असून यांचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक खालील प्रमाणे आहे :-

कार्यालयीन पत्ता व दूरध्वनी क्रमांक.
श्रीमती योगिनी घारे
घटक महाविद्यालये व संस्था कक्ष
अपिलिय प्राधिकारी,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
०२२ - २२७०८७०० विस्तारीत क्र. ५४०
थेट दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२६७१४३०

आपला विश्वासू,

(संजय अंबाडे)